राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या शिफारशीनुसार मृत न्यायाधीन बंदी श्री.शेख करीम शेख शबीर यांच्या अवलंबितांना रु.२.५०,०००/- (रुपये दोन लक्ष पन्नास हजार फक्त) एवढया रकमेची नुकसानभरपाई मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक-एमआयएस-०१९९/३५(१०५)/पीआरएस-२.

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२. दिनांक :- २ मार्च, २०००

वाचा:- सहाय्यक प्रबंधक (विधी) राष्ट्रीय मानवी हक्क आयोग (विधी विभाग) ,नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्रमांक-३६/१३(१०६)/८६-एलडी दिनांक २५.११.१९९९.

<u>शासन निर्णय:-</u> यवतमाळ जिल्हा कारागृहातील न्यायाधीन बंदी श्री. शेख करीम शेख शबीर यांच्या कारागृहीन मृत्यूच्या संदर्भात राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने राज्य शासनास मृत न्यायाधीन बंद्याच्या अवलंबितांना रुपये २,५०,०००/- (रुपये दोन लक्ष पन्नास हजार फक्त) एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून एक महिन्याच्या आत अदा करावी, अशी शिफारस केली आहे व त्याप्रमाणे मृत न्यायाधीन बंदी श्री. शेख करीम शेख शबीर यांच्या अवलंबितांना रुपये २,५०,०००/- (रुपये दोन लक्ष पन्नास हजार फक्त) एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून अदा करणे आवश्यक आहे.

मृत न्यायाधीन बंदी श्री. शेख करीम शेख शबीर यांच्या अवलंबितांना रुपये २,५०,०००/- (रुपये दोन लक्ष पन्नास हजार फक्त) एवढी रक्कम आकस्मिकता निधीतून अग्रीम म्हणून हया आदेशान्वये कारागृह महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या स्वाधीन करण्यांत येत आहे. ही रक्कम त्यांनी मृत न्यायाधीन बंदी श्री. शेख करीम शेख शबीर यांच्या अवलंबितांस दिनांक ३१ मार्च२००० पूर्वी अदा करावी.

वरीलप्रमाणे रु.२,५०,०००/- (रुपये दोन लक्ष पन्नास हजार फक्त) एवढा येणारा खर्च मागणी क्रमांक-बी-७,२०५६-तुरुंग-१०१(दोन)जिल्हा तुरुंग-२० इतर खर्च ([illegible]) योजनेतर (भारित) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा व हा खर्च आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या अग्रीमातून भागविण्यांत यावा. आकस्मिकता निधी अग्रीमातून करावयाच्या खर्चासंबंधी देयके काढताना ८०००१२३५ या संगणक संकेतांकाचा वापर करावा. आकस्मिकता निधी अग्रिमाची प्रतिपूर्ती करण्यासाठी पूर्ण रकमेची पूरक मागणी आगामी अधिवेशनात रितसर सादर करण्यांत येईल.

नियंत्रक अधिका-यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी [illegible] निधी खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिका-याकडे रक्कम सुपुर्द करण्यासंबंधीच्या आदेशात आणि रकमेतून खर्च करताना सादर करण्यांत येणा-या देयकावर "आकस्मिकता निधी अग्रीम शासन ज्ञापन ,वित्त विभाग,क्रमांक-आकनि- ११00/१२३ अर्थसंकल्प-१० दिनांक १५.२.2000 अन्वये मंजूर" असे लाल शाईने लिहावे अशी स्पष्ट सूचना अंतर्भूत करावी व ही सूचनाही लाल शाईने अधोरेखित करावी. तसेच आकस्मिकता निधीतून काढलेल्या अग्रीमातून करावयाच्या खर्चाबाबत महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिकेतील

प्रकरण-१६ मध्ये विशद केलेल्या नियमांचे व वित्त विभाग परिपत्रक क्रमांक-सीएनएफ/सीएलएफ-१०८३/१४०/अर्थसंकल्प-३ दिनांक २६ एप्रिल १९८३ व परिपत्रक क्रमांक- सीएनएफ-१०८६/१५/अर्थसंकल्प-३ दिनांक २८.४.८६ अन्वये देण्यांत आलेल्या सूचनांचेही काटेकोरपणे पालन करण्यांत यावे. तसेच अग्रीमातून प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची एकत्रित माहिती त्यांनी त्या महिन्यानंतर १५ तारखेपर्यंत वित्त विभाग (अर्थसंकल्प -३) मंत्रालय,मुंबई यांना पाठवावी व त्याची एक प्रत मा.अपर मुख्य सचिव(गृह) गृह विभाग मंत्रालय,मुंबई-४०० ०३२ यांचेकडे पाठविण्यांत यावी.

हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांकसीआर-८७/२०००/व्यय-८ दिनांक १९.१.२००० अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[गु. ज. कुलकर्णी]

कार्यासन अधिकारी,गृह विभाग,महाराष्ट्र शासन

प्रति,

कारागृह महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे.

कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय) पुणे,पूर्व विभाग,नागपूर.

अधीक्षक यवतमाळ जिल्हा कारागृह,यवतमाळ,जि.यवतमाळ.

महालेखापाल-१ /२(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.

जिल्हा कोषागार अधिकारी,यवतमाळ.

सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासन भवन,५ वा मजला,मुंबई. (दोन प्रती)

वित्त विभाग (व्यय-८/अर्थसंकल्प-३/२०)

गृह विभाग,पीआरजी-१.

निवडनस्ती